<u>नियमित दिवाणी दावा नं.२१७/ २०१५</u>
<u>( पांडुरंग चौगुले वि. हनिफ नदाफ वगैरे ४ )</u>

## <u>निशाणी २६ लगत हुकुम</u>

वादीने सदरचा अर्ज दि.प्र.सं. आदेश ६ नियम १७ अन्वये दावा दुरुस्तीसाठी केला आहे. प्रतिवादीतर्फे नि.३१ अन्वये लेखी म्हणणे देणेत आले. वादी व प्रतिवादींच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

२. वादीचे म्हणणेनुसार, प्रस्तुतचा दावा दाखल करतेवेळी वादींनी याच न्यायालयात प्रतिवादी नं.१ विरुध्द दाखल केलेल्या रे.दि.मु.नं.२४८/१९८७ या दाव्यामध्ये हुकुमनाम्याच्या अनुशंगाने काही कथने दाव्यामध्ये नमुद करणे राहून गेले आहे. प्रतिवादी नं. २ ते ४ यांनी त्यांचे कैफियतीमध्ये सदरच्या दाव्यातील हुकुमनामा त्यांच्यावर बंधनकारक नसल्याचा बचाव घेतला आहे. त्यामुळे सदरच्या दाव्यासंदर्भातील तपशीलवार कथने कलम ३ नंतर कलम ३अ मध्ये नमुद करणे आवश्यक आहे. म्हणून सदरची दुरूस्ती करणेकरिता अर्ज केला आहे.

३. प्रतिवादींचे म्हणण्यानुसार वादीने अर्जामध्ये नमुद केलेला मजकुर चुकीचा आहे. वादीने मागितलेली दुरुस्ती मंजूर केल्यास दाव्याच्या मुळ स्वरुपामध्ये बदल होणार आहे. सबब वादीचा अर्ज खर्चासह फेटाळणेत यावा.

४. वरील सर्व बाबींचा विचार करता खालील वादप्रश्न माझे निर्णयाकरीता उपस्थित झाले असून त्यावरील माझे निर्णय मी कारणमिमांसेसहित खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| <u>अ.क्र.</u> | <u>वादप्रश्न</u> | <u>निर्णय</u> |
|---|---|---|
| १. | वादी, अर्जात नमुद केलेप्रमाणे दावा दुरुस्ती करुन मिळण्यास पात्र आहे काय? | होय. |
| २. | आदेश काय ? | अर्ज खर्चासह मंजूर. |

## कारणमिमांसा

**वादप्रश्न क्रमांक १:**

५. वादी वकीलांच्या प्रस्तुतचा दावा दाखल करतेवेळी वादींनी याच न्यायालयात प्रतिवादी नं.१ विरुध्द दाखल केलेल्या रे.दि.मु.नं.२४८/१९८७ या दाव्यामध्ये हुकुमनाम्याच्या अनुशंगाने काही कथने दाव्यामध्ये नमुद करणे राहून गेले आहे. प्रतिवादी नं. २ ते ४ यांनी त्यांचे कैफियतीमध्ये सदरच्या दाव्यातील हुकुमनामा त्यांच्यावर बंधनकारक नसल्याचा बचाव घेतला आहे. त्यामुळे सदरच्या दाव्यासंदर्भातील तपशीलवार कथने कलम ३ नंतर कलम ३अ मध्ये नमुद करणे आवश्यक आहे.

६. निर्विवादपणे वादीने प्रस्तुतचा दावा निरंतर ताकीदीसाठी केला आहे. सदरचा दावा प्राथमिक स्तरावर प्रलंबीत आहे. प्रस्तुत दावेमध्ये अद्याप मुद्दे काढणेत आले नाहीत. वादीने मागितलेली दुरुस्ती मंजुर केल्यास दाव्याचे मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. तसेच सदरच्या दुरुस्तीमुळे प्रतिवादीवर फारसा अन्याय होणार नाही. याउलट दोन्ही पक्षकारांमधील मुख्य वादाचा अंतिम निर्णय देणेस मदत होणार आहे. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

१. अर्ज रक्कम रु.२००/–चे खर्चासहीत मंजूर करणेत येत आहे.

२. वादीने अर्जात मागितलेली दावा दुरुस्ती १४ दिवसात करुन त्याप्रमाणे दुरुस्त दाव्याची सुधारीत दुरुस्त प्रत त्वरील दाखल करावी.

सही/–२०.४.१६
(एस.एस.पाटील )
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर
मिरज

मिरज
दिनांकः २०.०४.२०१६